महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,मुंबई ४०० ०१९
website : www.mahadiscom.in
email : managerpom@mahadiscom.in
दुरध्वनी क्र.: ०२२ - २४०७७४४१

क्र. मासंवि/रवका/न.क्र.०९/**२५२२८** **दिनांक:** २२.०८.२०२३

प्रति,
मुख्य अभियंता,
म.रा.वि.वि.कं.मर्या.
सर्व परिमंडळ.

**विषय:-** कंपनीच्या सेवेत कार्यरत दिव्यांग (अस्थिव्यंग) कर्मचाऱ्यांना सहाय्यक तंत्रज्ञान व उपकरणे उपलब्ध करून देणेबाबत.

**संदर्भ:-** १) प्रशासकीय परिपत्रक क्र. ६३० दि.१०.०८.२०२१.
२) पत्र क्र. मासंवि/रवका/न.क्र.०९/२६१६७ दि.२५.१०.२०२१.
३) पत्र क्र. मासंवि/रवका/न.क्र.५/२३२४८ दि.०६.०९.२०२२.
४) प्रहार दिव्यांग पत्र दि.१०.०४.२०२३.

*******

उपरोक्त संदर्भीत विषयांस अनुसरून महाराष्ट्र शासनाने पारित केलेल्या शासन निर्णयाच्या धर्तीवर कंपनीमधील दिव्यांग अधिकारी व कर्मचारी यांना सहाय्यक तंत्रज्ञान / उपकरणे / वाहने उपलब्ध करुन देण्याकरिता संदर्भीय क्र.०१ व ०२ अन्वये दिव्यांग कर्मचाऱ्यांना वाहन उपलब्ध करुन देण्याच्या कार्यपध्दती बाबत निर्देश दिलेले आहेत.

२. तसेच, संदर्भीय पत्र क्र. ३ अन्वये दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या मागणीनुसार शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या खरेदी पध्दतीचा अवलंब करून GEMS प्रणालीद्वारे BIS प्रमाणीत केलेली साधने व उपकरणे उपलब्ध करून देणेकरिता व संगणकीय प्रणालीमध्ये नोंदणी करण्यासाठी परिमंडळ निहाय माहिती भरून मागविण्यात आलेली होती.

३. तथापि, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आले आहे की, परिमंडलांतर्गत कार्यरत दिव्यांग अधिकारी व कर्मचारी यांना उपरोक्तपणे पारित करण्यात आलेल्या सूचनांनुसार सहाय्यक तंत्रज्ञान/ उपकरणे/ वाहने उपलब्ध करुन देण्याकरिता बराचसा विलंब झालेला आहे. तसेच, संबंधीत मंडल कार्यालयाकडून निधी ठपलब्ध करून घेण्याकरिता पाठपुरावा होत नसल्यानेही विलंब होत आहे. यास्तव, या बाबतची कार्यपध्दती सविस्तरपणे विषद करण्यात येत आहे.

४. प्रथमत: परिमंडळ स्तरावरील दिव्यांग अधिकारी व कर्मचाऱ्यांची माहिती उपलब्ध करुन ज्या दिव्यांग अधिकारी व कर्मचाऱ्यांना सहाय्यक तंत्रज्ञान व उपकरणे अंतर्गत दुचाकी व Adoption दयावयाचे आहेत, त्या अधिकारी व कर्मचाऱ्याने स्वत: वास्तव्यास असलेल्या संबंधित परिवहन कार्यालयाकडून हाजीअली, मुंबई येथील संस्थेस देण्याकरिता संचालक, ऑल इंडिया इस्टिटयुट ऑफ फिजीकल, मेडीसीन अँड रिहॅबिलीटेशन, हाजीअली केशवराव खाडे मार्ग, हाजीअली सरकारी वसाहत, महालक्ष्मी, मुंबई ४०००३४ च्या नावे पत्र घ्यावे. त्यानंतर सदर पत्र, आधारकार्ड व दिव्यांग असलेबाबतचे वैद्यकीय प्रमाणपत्र ऑल इंडिया इस्टिटयुट ऑफ फिजीकल, मेडीसीन अँड रिहॅबिलीटेशन, हाजीअली, मुंबई च्या addlectot@aiipmr.gov.in या ई-मेल वर नोंदणी करण्यास पाठवावे. हाजीअली मुंबई या संस्थेने दुचाकी व सहाय्यक उपकरण (Adoption) चालविणेस शारिरिक तंदुरुस्तीचे प्रमाणपत्र, (Physical Fitness Certificate) दिल्यावर सदर दिव्यांग अधिकारी व कर्मचाऱ्यास GEMS प्रणालीद्वारे दुचाकी व सहाय्यक उपकरण देणेबाबत कार्यालयीन स्तरावर पुढील प्रक्रिया पार पाडावी.

५.	सबब कळविण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालील ज्या दिव्यांग अधिकारी व कर्मचारी यांनी उपरोक्त तरतुदी अंतर्गत वाहन मागणी केलेली आहे, अशा अधिकारी व कर्मचारी यांना वाहन देण्याकरिता GEMS प्रणालीत आपल्या स्तरावर ज्या ठिकाणी परिमंडल कार्यालय आहे त्या ठिकाणच्या मंडळ कार्यालयाची नोंदणी मुख्य अभियंता (स्थापत्य), सांघिक कार्यालय, मुंबई यांचे कार्यालयास संपर्क साधून करण्यात यावी. तसेच, नोंदणी झालेल्या मंडळाने संपुर्ण परिमंडळामधील दिव्यांग अधिकारी व कर्मचारी यांना GEMS प्रणालीद्वारे BIS प्रमाणीत केलेली साधने / उपकरणे / वाहने शक्य तितक्या लवकर खरेदी करुन उपलब्ध करून द्यावीत. तसेच आवश्यक निधी उपलब्ध करुन घेण्याबाबतची जबाबदारी सुध्दा संबंधीत नोंदणी केलेल्या मंडल कार्यालयाची राहील.

६.	सबब, उपरोक्त कार्यपध्दतीनुसार दिव्यांग अधिकारी व कर्मचारी यांना सहाय्यक उपकरणे / वाहने देण्याबाबतची परिमंडळाअंतर्गत प्रकरणे त्वरीत निकाली काढण्याबाबत संबंधीताना आदेश देण्यात यावेत.

**(भूषण कुलकर्णी)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत सविनय सादर:-**
१) संचालक (मासं)/(वित्त), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) कार्यकारी संचालक (विवले), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

**प्रत रवाना:**
१) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्यकारी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.